## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/१०/२०१७

**१) सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक २४/१०/२०१७ चे १८.०० ते २५/१०/२०१७ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी लक्ष्मण दयाराम भोयर वय ४२ वर्ष, रा. मुजबी हा आपल्या बहीणीच्या गावी गराडा खुर्द येथे मंडई निमीत्त घराला कुलुप लावुन गेले असता काणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे गच्ची वरील दाराची कडी तोडुन आत प्रवेश करुन घरातील आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा गोप वजन १२ ग्रॅम, व नगदी १०,०००/–रु. असा एकुण ३०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) महिलेचा अश्लिल विडीओ व फोटोग्रॉफी बनवुन व ते प्रसारीत करुन बदनामी करण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/०९/२०१७ चे आज पर्यत यातील फिर्यादीला गर्भधारणा करुन देतो म्हणुन वेळोवेळी घरी बोलावुन लिंबु व अंगारा ओवाळुन मंत्रोपचार करुन गुंगी देणारे पदार्थ देवुन तिची अश्लिल विडीओ व फोटोग्राफी बनविले व पैसे न दिल्यास विडीओ प्रसारीत करुन बदनामी करण्याची धमकी दिली तसेच अ.नि.स.च्या कार्यकर्त्याना सुध्दा पोट दुखत असल्याने तंत्रमंत्राचा उपयोग करुन लिंबु व लाल धागा देवुन वारंवर पैश्याची मागणी करीत असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५०६(ब),३४ भादंवि. सहकलम ३(२) महा.जादुटोणा प्रती अधी सहकलम ७ मे ॲन्ड ड्र मे. ॲक्ट सहकलम ४३,६७ माहिती तंत्रज्ञान कायदा. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. ढोबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही आई सोबत मामा चे घरी गेली असता आईला कम्पुटर क्लास ला जातो म्हणुन निघुन गेली परत आली नाही यातील आरोपीने फिर्यादीचे मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) शेतातील धानाची चोरी :–**

दिनांक ०५/१०/२०१७ ते ७/१०/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती गिता प्रशांत मानकर वय ४६ वर्ष, रा. चिचाळ हिचे शेतातील पाऊन एकर अतीक्रमीत शेतातील धान किंमती १५,०००/–रु. चे आरोपीने कापुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**५) समर्शिबल मोटार पंप, केबल वायर नायलॉन रस्याची चोरी :—**

दिनांक २३+२४/१०/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी सौ. गिता अनमोल बोरकर वय ३३ वर्ष, रा. आंबाडी यांचे घराचे बांधकाम सुरु असलेल्या प्लॅटवर बोरवेलला लावलेली समर्शिबल मोटार पंप १ एचपी ची १२० फुट केबल वायर, नायलॉन रस्सा १२० फुट असा एकुण १२,७१४/—रु. चा माल कोणीरती अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) चाकुने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २४/१०/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी देवानंद रामक्रिष्ण मतारे वय २४ वर्ष, रा. पिंपळगाव हा लावणीचा कार्यक्रम पाहण्यास गेला असता तिथे भांडण सुरु असतांनी भांडणातुन मावस भाऊ याला बाहेर काढण्यास गेला असता यातील आरोपीने फिर्यादीस पोटावर डावे बाजुला चाकुने मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४, भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**७) अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी . :—**

दिनांक २५/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, भंडारा, कारधा व सिहोरा येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०८ लिटर हातभट्टी दारू १८० किलो सडवा मोहा+ साहीत्य किंमती २३,०१०/—रु,तसेच किमती ६८९३/रु असा एकुन २९,९०३/रु. चा माल जप्त करण्यात आला.

26.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता